# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 26/12/2022 (सोमवार) दुपार

---

## जबरी संभोग

**पो.स्टे. पारशिवनी** :– दिनांक २२/११/२०२२ चे १३.०० वा. ते दिनांक ११/१२/२०२२ चे १४.०० वा. दरम्यान फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय ०९ वर्षीय पीडिता हिला आरोपी नामे– १) रोशन अशोक वाढीवे वय २२ वर्ष, रा. सिंगोरी (आबादी) ता. पारशिवनी २) विधीसंघर्षीत बालक यांनी संगनमत करून पिडीत मुलीच्या अल्पवयाचा गैरफायदा घेऊन तिच्याशी शारीरीक संभोग केल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७६ (ड ब), ३७६(२), (एन), ५०६ भादवी. सहकलम ४, ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १) याला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक सिमा बेदरे पोस्टे रामटेक विभाग रामटेक (पोक्सो सेल) मो. क. ९०९६३२६०१२ या करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. सावनेर** :– दिनांक २५/१२/२०२२ चे १९.१५ वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय १२ वर्ष ०८ महिने हिला मागील दोन दिवसापासुन आरोपी क्र.– १) सुरज उर्फ स्वामी गौतम रा. हवामहल डब्लुसीएल वाघोडा सावनेर व २) सोमनाथ सहानी, रा. डब्लुसीएल वाघोडा सावनेर ता. सावनेर जि. नागपुर हे फिर्यादीचा पाठलाग करून तिची छेडखानी करीत होते परंतु फिर्यादी तिच्या आईच्या बोलण्यावरून त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. नमुद घटनावेळी फिर्यादी व तिची आई हे दोघे त्यांच्या घरी पायदळ जात असतांना आरोपी क. १) व २) हे मोटरसायकलने मागुन येवुन आरोपी क.१ हा मोटरसायकल चालवित होता व आरोपी क. २ हा मोटरसायकलवर मागे बसला होता. मोटरसायकलवर मागे बसलेला आरोपी क्र. २ याने अचानक फिर्यादीचा उजवा हात पकडुन त्याच्याकडे ओढले त्यामुळे फिर्यादी ही मम्मी मम्मी ओरडली असता तिच्या आईने तिच्याकडे असलेली बॅग खाली फेकली व फिर्यादीला पकडुन आरोपीला हटकले असता आरोपी क. १ याने फिर्यादीच्या आईची गच्ची पकडली व अश्लील शिवीगाळी करून धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३५४, ३५४(ड), २९४, ५०६, ३४ भा.द.वि. सहकलम ८, १२, बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रियंका गेडाम पो. स्टे. कळमेश्वर मो.न. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**